# शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभाग, पुणे

## ११ वी ऑनलाईन प्रवेश सन २०१४

**शैक्षणिक वर्ष २०१४ मध्ये ११ वी प्रवेश ऑनलाईन होणार आहेत, हे आपणास ज्ञात आहेच. या बाबत विदयार्थी व पालक यांच्यात जाणीव-जागृती होण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

- या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात मुख्याध्यापकांचे प्रबोधन व प्रशिक्षण वर्ग घेण्यात आलेले आहेत. पुढील आवश्यक प्रशिक्षण वर्ग दि. २८.३.२०१४ ते ३.४.२०१४ या कालावधीत झोन निहाय घेण्यात येणार असून त्याचे वेळापत्रक www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### सर्वसामान्य सूचना

१. मुख्याध्यापकांनी इयत्ता १० वीच्या विदयार्थी व पालकांची सभा घेऊन फॉर्म भरण्याचे प्रशिक्षण दयावे.

२. ऑनलाईन फॉर्म संदर्भात वेबसाईट ओपन केव्हा होईल याची तारीख व माहिती वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाईल. त्यानुसार विदयार्थ्यांनी प्रवेश अर्जामधील भाग-१ निकालापूर्वी भरण्यास हरकत नाही.

३. **" प्रवेश मिळवून देतो "** अशा कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये. व आपली मूळ कागदपत्रे, गुणपत्रिका, दाखला कोणाच्याही हातात देऊ नये.

४. माध्यमिक शाळा संलग्न कनिष्ठ महाविदयालयातील व्यवस्थापन कोटा (५ %) अल्पसंख्यांक कोटा (५० %) In house quota (२० %) चे प्रवेश **Off line** होतील.

५. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा, कॉलेजचे प्रवेश On line पध्दतीने होतील. उर्वरित म्हणजे **ऊर्दू, तेलगू, गुजराथी, हिंदी, ..... इत्यादी उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रवेश Off line होतील.**

६. M.C.V.C किमान कौशल्यावर आधारित व्यवसायिक अभ्यासक्रम, होमसायन्स, व्यवस्थापन, अल्पसंख्याक व इन हाऊस कोटयाचे प्रवेश, तांत्रिक कनिष्ठ महाविदयालयातील प्रवेश, रात्र कनिष्ठ महाविदयातील प्रवेश हे ऑनलाईन न होता संबंधित कनिष्ठ महाविदयालयाच्यास्तरावरुन होतील. **(Off line)**

७. **पूर्ण फॉर्म भरण्यासंबधीच्या सर्व सूचना शाळास्तरावर व शिक्षण उपसंचालक कार्यालयाने नेमून दिलेल्या केंद्रावरच दिल्या जातील. या व्यतिरिक्त कोणत्याही खाजगी क्लास किंवा खाजगी केंद्रावरुन दिलेल्या सूचना वा प्रशिक्षण वैध धरले जाणार नाही, याची जाणीव पालकांना व विदयार्थ्यांना करुन दयावी.**

### पुस्तिकेसंदर्भात

१. प्रत्येक शाळेला इयत्ता १० वी तील विदयार्थी संख्येनुसार माहिती पुस्तिका, Log in Id व Password असलेले पाकिट दिले जाईल. विदयार्थ्यांनी आपल्या शाळेतून ही माहिती पुस्तिका विकत घ्यावयाची आहे. याची किंमत १०० रुपये असणार आहे. या पुस्तिकेसह Log in Id व Password विदयार्थ्यांनी जपून ठेवायचे आहे.

२. पुस्तकांच्या हिशोबासाठी मुख्याध्यापकांनी स्वतंत्र रजिस्टर ठेवावे. पुस्तकाचे पैसे भरण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र बँकेच्या **कर्वेरोड** शाखेच्या ६०१६५३०६१८२ या खाते क्रमांकावर **Std. XI Centralise Admission Committee, Pune** या नावे पैसे जमा करावे.

३. रक्कम जमा झाल्यापासून ३ दिवसांच्या आत सदर खात्यावर भरावयाची आहे.

# फॉर्म संबंधातील सूचना

१. फॉर्म काळजीपूर्वक वाचावा.

२. त्यातील प्रपत्र-१ निकालापूर्वी माहिती पुस्तकात दिलेल्या नमुन्याप्रमाणे भरावा.

३. विशेष आरक्षण लागू असलेल्या विदयार्थ्यांनी खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे संबंधीत सक्षम अधिका-याकडून प्रमाणपत्र उपलब्ध करुन घ्यावे.

| अ.क्र. | विशेष आरक्षण | प्रमाणपत्र देणा-या अधिका-याचे नाव |
|---|---|---|
| १ | खेळाडू | जिल्हा क्रीडा अधिकारी |
| २ | कला व सांस्कृतिक | कला व सांस्कृतिक संचालनालय, मुंबई |
| ३ | अपंग | जिल्हा शल्य चिकित्सक |
| ४ | स्वातंत्र्य सैनिक | जिल्हाधिकारी |
| ५ | माजी सैनिक | जिल्हा सैनिक अधिकारी |
| ६ | आजी सैनिक | संबंधित विभागाचे प्रमुख |

**४. फॉर्म भरताना खालीलप्रमाणे कागदपत्रे तयार ठेवणे आवश्यक आहे.**

| **खुला वर्ग** | **सामाजिक आरक्षण (SC/ST/VJA/NTB/NTC/NTD/ OBC/SBC)** | **विशेष आरक्षण अपंग/क्रीडा/कला/ स्वातंत्र्य सैनिक/आजी-माजी सैनिक/बदली होऊन आलेले पालक** |
|---|---|---|
| * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला | * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला<br>*उपरोक्त प्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र | * गुणपत्रिका<br>* शाळा सोडल्याचा दाखला<br>* उपरोक्त प्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र |

५. प्रपत्र-२ भरण्यापूर्वी पुस्तिकेचा बारकाईने अभ्यास करावा. विदयार्थ्याला ज्या शाखेमध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे. त्या शाखेचे पसंतीक्रम तात्पुरत्या स्वरुपात लिहून ठेवावेत.

६. प्रत्येक अर्जदाराला एकच अर्ज करता येईल. एकाच अर्जामध्ये एक अथवा जास्तीत-जास्त **दोन शाखांची** विदयार्थी निवड करु शकेल. जर दोन शाखांची निवड केली तर अर्जदाराला त्याचे पसंतक्रम सरमिसळ पध्दतीने भरता येतील. **परंतु प्रत्येक शाखेचा किमान एक पसंतीक्रम देणे अनिवार्य राहील.**

७. कला, विज्ञान, वाणिज्य या शाखांसाठी अर्ज करताना पुढीलप्रमाणे दोन गटांत पसंतीक्रम देणे अनिवार्य राहील.

**अ.** पहिल्या गटामध्ये संपूर्ण पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या गुणवत्तेनुसार पसंतीक्रमानुसार किमान २० (किमान) व कमाल ३० पर्यंत पसंतीक्रम देता येतील.

**ब.** दुस-या गटामध्ये पसंतीक्रम देताना पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या पसंतीचा कोणताही एक झोन निवडून त्या झोन मधील गट ' अ ' मध्ये दिलेले पसंतीक्रम वगळून किमान १५ अथवा उर्वरित पसंतीक्रम देता येतील. तथापि त्यापैकी माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक शाळेचे किमान ५ किंवा ५ पेक्षा कमी असल्यास उपलब्ध असलेल्या माध्यमिक शाळेला जोडलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळांचे पसंतीक्रम देणे अनिवार्य राहील.

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे**